**म.सं.कौ.हिं.का. अर्ज क्र. ०२/२०२२ मधील निशाणी क्र. १५ वरील आदेश**

सौ. नम्रता गंगाधर पाटील वि. श्री. गंगाधर शिवाजी पाटील

प्रस्तुतचा अर्ज हा अर्जदार /तक्रारदार हिने कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५ चे कलम १२ अन्वये गैरअर्जदार यांचे विरूद्ध विविध अनुतोषासाठी दाखल केला आहे. सदर अर्जामध्ये अर्जदार हिने नि.क्र. १५ वरील अर्जाद्वारे सदर अधिनियमाच्या कलम २१ अन्वये तिचा मुलगा नामे नील गंगाधर पाटील व मुलगी नामे गिरीजा गंगाधर पाटील यांचा अंतरीम ताबा गैरअर्जदाराकडून देवविण्याची विनंती केली आहे. अर्जाच्या पुष्ठयर्थ विहीत प्रपत्रात अर्जदाराचे शपथपत्र जोडलेले आहे. अर्जात अर्जदाराने नमूद केलेल्या कथनांवरुन अर्जदारास गैरअर्जदारांकडून झालेल्या गृह हिंसाचाराचा इत्यंभूत तपशिल येथे नमूद करणे आवश्यक नाही. तथापि, अर्जात अर्जदाराने कथन केलेल्या गृह हिंसाचारात्मक बाबींचा संक्षेपाने या ठिकाणी उल्लेख केला जाऊ शकतो.

२. अर्जदार यांचे कथन असे की, गैरअर्जदार यांनी सन २०१९ मध्ये अर्जदार हिचा विश्वासघात करून अर्जदार हिचा त्याग करणेच्या हेतूने अर्जदार हिचा मुलगा नील व मुलगी गिरीजा हिला जाणुनबुजून दूर ठेवलेले आहे. गैरअर्जदार यांनी सन २०१९ पासून त्यांचा मुलगा नील व मुलगी गिरीजा यांना ऑस्ट्रेलियामध्ये ठेवल्यापासून अर्जदार यांना भेटू दिले नाही अथवा कोणत्याही प्रकारे संपर्क होवू दिलेला नाही. अशाप्रकारे गैरअर्जदार यांनी अर्जदार यांना तिचे मुलांचे प्रेमापासून व सहवासापासून वंचित ठेवलेले आहे. तसेच, अर्जदार हिचा पासपोर्ट व व्हीसा इ. कागदपत्रे गैरअर्जदार यांनी बेकायदेशीरपणे स्वत:जवळ ठेवून अर्जदार हिला ऑस्ट्रेलियात मुलांना भेटायला जाणेपासून जाणिवपूर्वक प्रतिबंध केलेला आहे. गैरअर्जदार यांनी अर्जदार हिला तिच्या मुलांना भेटणेची कोणतीही सोय केलेली नाही. त्यामुळे, अर्जदार हिचे मानसिक संतुलन बिघडत चाललेले आहे. या सर्व कारणास्तव अर्जदार हिने या प्रकरणाचा अंतिम निकाल होईपावेतो तिचा मुलगा नील व मुलगी गिरीजा यांचा अंतरिम ताबा तिच्याकडे देवविण्याची विनंती केली आहे. अर्जातील मजकूराच्या पुष्ठयर्थ अर्जदाराचे शपथपत्र आहे.

३. वाजवी संधी देवूनही गैरअर्जदार यांनी सदर अर्जास त्यांचा खुलासा सादर केलेला नाही त्यामुळे या अर्जाची सुनावणी गैरअर्जदार यांच्याविरूद्ध एकतर्फी चालविण्यात येत आहे.

४. अर्जदार यांच्यातर्फे अधिवक्ता श्री. के.एस. सुरूतकर व गैरअर्जदार यांच्यातर्फे श्री. ए.एस. कांबळे यांचा युक्तीवाद ऐकला.

५. अर्जदारच्या कथनाचा साकल्याने विचार करता पुढील बाबी माझ्या विचारार्थ निर्माण होत असून त्यावरील माझे निष्कर्ष मी त्यापुढे येणाऱ्या कारणमीमांसेस अनुसरुन पुढीलप्रमाणे नोंदविले आहेत.

| | विचारार्थ बाबी | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | गैरअर्जदारांकडून गृह हिंसाचार झाल्याचे अर्जदार सकृतदर्शनी सिध्द करते काय ? | होय |
| २. | कु. नील गंगाधर पाटील व कु. गिरीजा गंगाधर पाटील याचा अंतरिम ताबा मिळण्यास अर्जदार पात्र आहे काय ? | अंतरीम ताबा ऐवजी मुलांना नियतकालीक भेटीच्या अनुतोषास पात्र |
| ३. | काय आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## <u>कारणमिमांसा</u>

**<u>बाब क्र. १ करिता</u> –**

६. अर्जातील कथनाचे अवलोकन करता हे स्पष्ट होते की, गैरअर्जदार हा अर्जदार हिला इंग्रजी बोलता येत नाही, तसेच तिला ऑस्ट्रेलियातील नागरीकांप्रमाणे राहता येत नाही या कारणांवरून गैरअर्जदार अर्जदारास टोमणे मारुन शारीरिक व मानसिक त्रास देत असल्याचे निष्पन्न होत आहे. याशिवाय, गैरअर्जदार हा त्याच्या मित्रांसमोर अर्जदार हिस 'अर्जदार हिला कोणतेही काम येत नाही, अर्जदार ही अडाणी आहे' असे म्हणून अर्जदार हिचे मनाला लागेल असे कृत्य करत होते. तसेच, अर्जदार हिची प्रसुती झाल्यानंतर गैरअर्जदार हा अर्जदार हिस 'तुला काय धाड भरलीय काय, नवऱ्याला व सासऱ्याला काम करायला लावतेस, लाज वाटत नाही का, तुझ्या आई–बापाने तुला हेच शिकविले आहे का' असे म्हणून मानसिक त्रास देत होते. तसेच गैरअर्जदार क्र. २ ही अर्जदारास 'जगात हिच तेवढी बाळंत झालेली आहे काय, मी ही मुलांना जन्म दिलेला आहे, जमत नसेल तर तुझ्या आई बापाला बोलावून घे सेवेसाठी' अशा प्रकारे टोमणे मारत होती. तसेच अर्जदार ही विवाहानंतर ऑस्ट्रेलिया येथे नांदण्यास गेल्यानंतर गैरअर्जदार क्र. २ व ३ यांनी अर्जदार हिला तिचे माहेरी कोणताही संपर्क करणेस अगर माहेरच्या लोकांना भेटण्यास मनाई केले होती. तसेच गैरअर्जदार हे बऱ्याच वेळी रात्री बाहेर राहत होते व लवकर घरी परत येत नव्हते. त्यामुळे अर्जदार

हिला घरी मुलांना सांभाळून घरचे काम करताना दमछाक व्हायची. सन २०१२ मध्ये गैरअर्जदार क्र. १ यांनी अर्जदार यांचेबरोबर विनाकारण भांडणे काढले व मुलगा नील याचे समोर मारहाण केली त्यामुळे अर्जदार हिला ऑस्ट्रेलिया येथे जगणे मुश्कील झाले त्यामुळे न राहून अर्जदार हिला भारतात परतावे लागले. पती जर पत्नीस मानसिक त्रास देत असेल तर, अशा प्रकारचे कृत्य निश्चितच गृह हिंसाचार अशा सदरात येते. गैरअर्जदार क्र. १ याने त्यांच्या मुलांना अर्जदारापासून जबरदस्तीने नेले असून तो अर्जदारास तिच्या मुलांना भेटण्यास देत नाही. उपरोक्त नमुद अर्जातील कथने अर्जदाराने शपथेवर केली आहेत. त्यास आपल्या बचावपत्राव्दारे गैरअर्जदार क्र. १ याने नाकारले असले तरी सध्यस्थितीत सकृतदर्शनी परिस्थिती पाहण्यासाठी ही बाब लक्षणीय ठरते की, अर्जदार ही गैरअर्जदार क्र. १ सोबत व तिच्या मुलांसोबत राहत नाही. गैरअर्जदार क्र. १ व अर्जदारची मुले ही परदेशात वास्तव्यास असल्याचीही बाब उभयमान्य असल्याने अर्जदाराचे गैरअर्जदार क्र. १ व त्यांच्या मुलांपासून वेगळे राहणे हेच मुळात गृहहिंसाचाराच्या सदरात मोडते. याशिवाय, अर्जात नमुद इतरही आरोप हे गैरअर्जदारांनी अर्जदाराचे गृह हिंसाचारात्मक छळ केल्याचे सकृतदर्शनी स्पष्ट करतात. यास्तव, मी **बाब क्र. १** पोटी **सकारात्मक** निष्कर्ष नोंदवित आहे.

**<u>बाब क्र. २ करिता</u>** –

७. अर्जदाराने मागणी केलेल्या अनुतोष मिळविण्यासाठीची अर्जदाराची पात्रता तपासत असताना उपरोक्त चर्चेच्या अनुषंगाने अर्जदार ही गैरअर्जदारांकडून करण्यात आलेल्या गृह हिंसाचारात्मक कृत्यांची पिडीत असल्याचे सकृतदर्शनी स्पष्ट होत असल्याची बाब महत्वाची ठरते. कु. नील व कु. गिरीजा यांचे वय, त्याचे शैक्षणिक भवितव्य, त्यांना आवश्यक असणारा सकस आहार व त्याच्या बाल्यावस्थेतील अधिकार या सर्व बाबींची बारकाईने चिकित्सा करता, त्यांना केवळ अंगभर वस्त्र, पोटभर अन्न दिले म्हणजे एखाद्याने त्याचे योग्य पालन पोषण केले असा त्याचा मुळीच अर्थ होऊ शकत नाही. कु. नील व कु. गिरीजा यांचे वय सद्य स्थितीत खुप कमी असून त्यांच्या वयाचा विचार करता, त्यांना मातृस्नेहाची व वात्सल्याची नितांत आवश्यकता आहे याबद्दल दुमत असू शकत नाही. मात्र, अर्जदार व गैरअर्जदार यांचा मुलगा नील व मुलगी गिरीजा हे दोघेही मागील प्रदीर्घ काळापासून ऑस्ट्रेलिया येथे गैरअर्जदार यांच्यासोबत राहण्यास असून तेथेच शिक्षण घेत आहेत. तसेच, त्यांची मुलगी गिरीजा ही एका आजाराने त्रस्त असून तिचे ऑस्ट्रेलिया येथे उपचार चालू आहेत ही बाब अर्जदार सुद्धा तिच्यावतीने सादर केलेल्या युक्तीवादामध्ये मान्य करते. त्यामुळे, जर सदर अर्ज अर्जदाराच्या मागणीप्रमाणे मंजुर झाल्यास त्यांची मुले शिक्षणापासून वंचित राहतील.

त्याऐवजी गैरअर्जदार क्र. १ हे त्यांच्या मुलांना शालेय सुट्टी असताना अथवा अन्य प्रसंगोचीत ज्यावेळी भारतात येतात त्यावेळी वर्षातून दोनवेळा अर्जदार यांचेकडे १५–१५ दिवस भेटण्यासाठी सोडून जाण्याचा आदेश करणे उचित वाटते, की ज्यामुळे अर्जदार ही तिच्या अपत्यस्नेहापासून व तिची मुले ही मातृस्नेहापासून कायमस्वरूपी वंचित राहणार नाहीत व त्यांच्यातील भावबंध अबाधित राहील. त्यामुळे विचारार्थ बाब क्र. २ पोटी अर्जदारास कु. नील व कु. गिरीजा यांचा अंतरीम ताबा देण्याऐवजी तिला या मुलांना नियतकालीक भेटीचा अनुतोष प्रदान केल्यास ते न्यायोचित राहील असा निष्कर्ष नोंदवून बाब क्र. ३ पोटी पुढील आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

नि.क्र. १५ वरील अर्ज पुढीलप्रमाणे मान्य करण्यात येत आहे.

गैरअर्जदार क्र. १ यास असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी त्यांच्या मुलांना शालेय सुट्टी असताना अथवा अन्य प्रसंगोचीत ज्यावेळी भारतात येतात त्यावेळी वर्षातून दोनवेळा किमान प्रत्येकी १५–१५ दिवस भेटण्यासाठी व राहण्यासाठी अर्जदार हिच्याकडे सोपवावे.

उपरोक्त आदेशास अधीन राहून कु. नील व कु. गिरीजा यांचा गैरअर्जदार क्र. १ कडे असणारा ताबा या प्रकरणाचा अंतिम निकाल होईपावेतो अथवा याविषयी या न्यायालयाकडून अन्य कोणताही आदेश होईपावेतो अबाधित राहील.

गैरअर्जदार क्र. १ याने उपरोक्तप्रमाणे या आदेशाचा त्वरित अंमल करावयाचा आहे.

या आदेशाची प्रत अर्जदार, गैरअर्जदार क्र. १ यांना त्यांनी मागणी केल्यानंतर विनामुल्य पुरविण्यात यावे.

या आदेशाची प्रत्येकी एक प्रत संरक्षण अधिकारी, चंदगड व पोलिस निरीक्षक, चंदगड पोलिस ठाणे, चंदगड यांना पाठविण्यात यावे.

DISTRICT COURT, MAHARASHTRA
Digitally signed by Amrit Chandrakant Birajdar
Date: 2022.12.28 16:51:41 +0530

चंदगड
दिनांक – २८/१२/२०२२.

**(अ.चं.बिराजदार)**
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, चंदगड.